# जाहिरात

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) जिल्हा अहिल्यानगर अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या प्रभागसंघाच्या माध्यमातून पारनेर आणि शेवगाव तालुक्यातील एकात्मिक शेती विकास प्रकल्पातर्गत खालील पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.न. | पद | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | IFC BLOCK ANCHOR<br>(पारनेर आणि शेवगाव प्रती तालुका ०१ जागा) | ०२ |

उपरोक्त पदाकरिता ठोक मानधन तत्वावर (कंत्राटी तत्वावर) प्रभागसंघाच्या अंतर्गत निवड करण्यासाठी दि. २३/०४/२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. याबाबत सविस्तर माहिती, अनुभव, शैक्षणिक पात्रता व अर्जाचा नमुना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहिल्यानगर यांच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. सदरहू जाहिरातीत बदल / पद संख्येत बदल / निवड प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहिल्यानगर यांनी राखून ठेवले आहेत.

सही/-

प्रकल्प संचालक

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अहिल्यानगर

# जाहिरात

उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM), अहिल्यानगर अंतर्गत पारनेर आणि शेवगाव तालुक्यातील एकात्मिक शेती विकास प्रकल्पाच्या अंतर्गत IFC BLOCK ANCHOR प्रती तालुका १ पद याप्रमाणे एकूण ०२ पदे भरण्यात येणार आहेत. या पदाकरिता ठोक मानधन तत्वावर (कंत्राटी तत्वावर) प्रभागसंघाच्या अंतर्गत निवड करण्यासाठी दि. २३/०४/२०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

**पदाचा तपशील-**

| **पदाचे नाव - IFC Block Anchor** | |
|---|---|
| पद संख्या | ०२ (पारनेर आणि शेवगाव प्रती तालुका १ पद) |
| शैक्षणिक अहर्ता | किमान कृषि व कृषि संलग्न पदवी जसे की कृषि तंत्रज्ञान, Bachelor of Science in Agriculture or Bachelor of Science in Horticulture or B. Tech. in Agriculture or Bachelor of Science in Fishery. Bachelor of Science in Forestry, Bachelor of Veterinary Science and Bachelor of Science in Animal Husbandry, Bachelor of Business Administration पदवी धारक असणे आवश्यक आहे**.** |
| अनुभव | संबंधित व्यक्ति पदवीधारक असल्यास १ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| निवडीचे निकष | १**.** वय- कमाल वय ४३ वर्ष असावे<br>२. कृषी, फलोत्पादन, मत्स्यपालन, पशुपालन, मधमाशी पालन इत्यादी क्षेत्रातील शेती व शेती आधारित उपक्रम याबाबत माहिती असली पाहिजे.<br>३. उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक आहे. समुदायाला सुलभ रीतीने समजावून सांगता येणे आवश्यक.<br>४. शेती व शेती आधारित मूल्यवर्धन साखळी उपक्रम अंमलबाजवणी बद्दल माहिती असणे आवश्यक आहे.<br>५. तांत्रिक ज्ञान- संगणकीय ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| भूमिका व जबाबदाऱ्या | १. प्रभागातील वरिष्ठ CRP इतर समुदाय संसाधन व्यक्ती यांच्याशी नियमित समन्वय साधून प्रभागाचे कामाचे नियोजन करणे.<br>२. CRP यांच्याकडून प्रभागातील मूलभूत सर्वेक्षण करून, मिळालेल्या माहितीच्या आधारावर सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करणे.<br>३. प्रभाग स्तरावर प्रकल्पाचे निरीक्षण आणि मूल्यमापन करून सदरचा अहवाल LSC कार्यकारिणी समिती, जिल्हा व तालुका अभियान कक्षास अहवाल सादर करणे.<br>४. वरिष्ठ CRP यांचा कामाचा आढावा घेऊन त्यांना पुढील कामाचे नियोजन देणे.<br>५. प्रभागातील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेती आधारित उपक्रम) यांना प्रत्यक्ष भेट देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे.<br>६. प्रभागाचा मासिक कृती आराखडा तयार करून आराखड़ा प्रमाणे कामे होणे अनिवार्य राहील तसेच सदर कामाचा अहवाल तालुका व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक- उपजीविका यांना दरमहा सादर करणे. |

| | |
|---|---|
| | ७. प्रभागातील प्रस्तावित उपक्रमांचे प्रस्ताव तालुका व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक- उपजीविका व संबधित व्यक्तींच्या मदतीने तयार करणे.<br>८. प्रभाग निहाय Product development करून त्याची Packaging व ब्रडिंग व संबंधित मार्केटिंग उपक्रमाकरिता काम पाहणे तसेच LSC चे व्यवस्थापन करणे, तसेच उपक्रमनिहाय लेखे व बैठकीचे इतिवृत्त अदयावत ठेवणे आणि वैविध्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करणे.<br>९. प्रभागामधील विविध प्रक्रिया यूनिट (Processing Unit), एकत्रीकरण सेंटर (Collection Centre), निविष्ठा यांची नियमित देखरेख करणे तसेच महिलांना तांत्रिक सहाय्य करणे.<br>१०. LSC च्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे. तसेच अद्यायवत प्रगतीचा MIS राखणे.<br>११. नियमित तालुका व्यवस्थापन कक्ष व जिल्हा अभियान कक्षाला कामाचा तपशील सादर करणे अनिवार्य असेल. |
| निवड प्रक्रिया | लेखी परीक्षा ४० गुण व प्रत्यक्ष मुलाखत १० गुण |
| | **लेखी व तोंडी परीक्षेचे निकष-**<br>१.लेखी परीक्षेची काठीण्य पातळी डिप्लोमा राहील.<br>२. लेखी परीक्षेचे विषय व गुणांकन पुढीलप्रमाणे<br>1. बुद्धिमत्ता चाचणी – ५ गुण<br>2. गणित – ५ गुण<br>3. कृषी व कृषी संलग्न – ३० गुण<br>३. सदर परिक्षा बहुपर्यायी असेल.<br>४. तोंडी परीक्षा १० गुणांची असेल.<br>५. तोंडी परीक्षेमध्ये संबंधित व्यक्तीचे संवाद कौशल्य, कामाचा अनुभव प्रात्यक्षिक अनुभव यासारख्या बाबींचा आधारावर गुणांकन करण्यात येईल. |
| अटी व शर्ती | निवड प्रक्रीयेमधील अटी व शर्ती-<br>सदर भरती प्रक्रिया मधील अटी व शर्ती प्रमाणे पद कमी अथवा जास्त अथवा बदल करण्याचे अधिकार निवड समितीस राखून ठेवण्यात आलेले आहे. याबाबत काही आक्षेप असल्यास त्याचे निराकरण करण्याचे अधिकार सर्वस्वी निवड समितीकडे राखून ठेवण्यात आले आहे. |

सदर पदाकरिता परिपूर्ण भरलेले अर्ज (शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह) अंतिम दिनांक २३/०४/२०२६ रोजी सायं.०५:०० वाजेपर्यंत व्यक्तीशः/ टपालाद्वारे विहित मुदतीत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नवीन प्रशासकीय इमारत, रेल्वे स्टेशन रोड, अहिल्यानगर या कार्यालयात पोहचतील अशा बेताने सादर करण्यात यावे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

**एकात्मिक शेती प्रभाग (IFC) विकास प्रकल्प अंतर्गत BLOCK ANCHOR सेवादाता पदासाठी अर्ज.**

उमेदवाराचा फोटो

**१.उमेदवाराचे संपूर्ण नाव :-**

**२.पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता :-**

**३.तालुका :-**

**४.जिल्हा :-**

**५.मोबाईल क्रं. :-**

**६.ई – मेल :-**

**७.शैक्षणिक अहर्ता :-**

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | उतीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८. अनुभव :-

| अ.क्र. | पदाचे नाव | संस्थेचे नाव | कामाचा कालावधी महिना व वर्ष | भूमिका व जबाबदारी | वेतन / मानधन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

९.संगणक हाताळण्याचे ज्ञान आहे का ? होय / नाही :-

१०.उमेदवारास दुचाकी वाहन चालविता येते का ? होय / नाही :-

११.अर्जासोबत जोडण्यात येत असलेल्या कागदपत्राची यादी –

१.
२.
३.
४.
५.

मी असे प्रमाणित करते / करतो की, आपले कार्यालयातील ............................................................ या पदासाठीची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असुन सदर जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून चुकीची व खोटी आढळून आल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

स्थळ :-

( उमेदवाराची स्वाक्षरी )